


दैनिक **आरंभ मराठी** www.arambhmarathi.com








■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 40 ■ शुक्रवार, 1 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


# सव्वा वर्षानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय सेवा सुरू होणार

## रूग्णांना मिळणार दिलासा; आता १०२० ते ५१०० रुपयांत एमआरआय तपासणी उपलब्ध

**आरंभ मराठी । धाराशिव**

सुमारे सव्वा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एमआरआय मशीन अखेर आजपासून (दि.१) रुग्णांच्या सेवेत दाखल होत आहे. यामुळे जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. फेब्रुवारी महिन्यात एमआरआय मशीन धाराशिव येथे दाखल झाली होती. मात्र विविध तांत्रिक मान्यता न मिळाल्यामुळे ही सेवा सुरू होण्यात अडथळे निर्माण झाले होते. गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या या अडचणी अखेर दूर झाल्याने आजपासून (दि.१) एमआरआय सेवा सुरू होत आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते एमआरआय मशीनचे ऑनलाईन लोकार्पण करण्यात येणार आहे. धाराशिव येथील मशीनचेही याच कार्यक्रमात




लोकार्पण होणार असून, त्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते प्रत्यक्ष फित कापून या सेवेला सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी दिली. दरम्यान, फेब्रुवारी २०२५ मध्ये धाराशिव



जिल्ह्यासाठी मंजूर झालेली ही एमआरआय मशीन दुसऱ्या जिल्ह्यात हलविण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पत्रकारांनी हा मुद्दा लावून धरल्याने अखेर ही मशीन धाराशिवमध्येच स्थापन करण्यात आली. त्यानंतरही तांत्रिक मंजुरीअभावी सेवा सुरू होऊ शकली नव्हती. आमदार कैलास पाटील यांनी या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुद्दा उपस्थित केला होता. एमआरआय सेवा सुरू करण्यासाठी कृष्णा डायग्नोस्टिक कंपनीसोबत पीपीपी (Public-Private Partnership) तत्वावर करार



करण्यात आला असून, कंपनीकडून सहा जणांचे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. एमआरआय तपासणीसाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात सुमारे १० हजार रुपयांपर्यंत खर्च करावा लागत होता. मात्र आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हीच तपासणी केवळ १०२० ते ५१०० रुपयांमध्ये उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. एमआरआय मशीन सुरू झाल्याने गंभीर आजारांचे निदान जलद आणि अचूक पद्धतीने होण्यास मदत होणार असून, जिल्ह्यातील आरोग्य सेवेला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

# धाराशिव जिल्ह्यात २५ महसूल कार्यालयांच्या उभारणीसाठी सव्वा चार कोटींचा निधी मंजूर

## ९ मंडळ अधिकारी आणि १६ तलाठी कार्यालयांचे आज पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार भूमिपूजन

**आरंभ मराठी । धाराशिव**

**धाराशिव जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तलाठी आणि मंडळ अधिकारी कार्यालयांच्या नवीन इमारती उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी एकूण ४ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, आजपासून या कामांना प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. यामधे ९ मंडळ अधिकारी कार्यालये आणि १६ तलाठी कार्यालये बांधण्यात येणार आहेत. याचे भूमिपूजन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते आज ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे.**

धाराशिव जिल्ह्यात ज्या ठिकाणी तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना स्वतंत्र कार्यालयांची सुविधा उपलब्ध नाही, अशा ठिकाणी नवीन इमारती उभारण्यात येणार आहेत. या अंतर्गत एकूण २५ कार्यालयांचे बांधकाम करण्यात येणार असून त्यामध्ये १६ तलाठी कार्यालये आणि ९ मंडळ अधिकारी कार्यालयांचा समावेश आहे. या कामांचा भूमिपूजन सोहळा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या उपस्थितीत आज (दि.१) ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहे. या उपक्रमामुळे महसूल विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मंडळ




अधिकारी कार्यालयांसाठी एकूण १ कोटी ९८ लाख १८ हजार रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. यात धाराशिव तालुक्यातील केशेगाव, ढोकी, तेर आणि जागजी येथे प्रत्येकी एक अशी चार कार्यालये उभारण्यात येणार आहेत. तुळजापूर तालुक्यात आरनी आणि तामलवाडी अशी दोन, लोहारा तालुक्यात धानुरी आणि माकणी येथे दोन, तर उमरगा तालुक्यात दाळिंब येथे एक मंडळ अधिकारी कार्यालय बांधण्यात येणार आहे. तलाठी कार्यालयांसाठी २ कोटी २३ लाख ३५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात धाराशिव तालुक्यातील चिखली येथे एक, तुळजापूर तालुक्यात ९, उमरगा तालुक्यात ३ आणि लोहारा तालुक्यात ३ अशी एकूण १६ कार्यालये उभारण्यात येणार आहेत. या सर्व इमारतींचे बांधकाम मजबूत, टिकाऊ आणि आधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रत्येक तलाठी कार्यालयासाठी जवळपास १५ लाख रुपये खर्च येणार आहे. तसेच प्रत्येक मंडळ अधिकारी कार्यालयासाठी २२ लाख रुपये खर्च येणार आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा अधिक सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

### मंडळ अधिकारी कार्यालये एकूण – ९

**धाराशिव (४) – केशेगाव, ढोकी, तेर, जागजी.**
**तुळजापूर (२) – आरणी, तामलवाडी**
**लोहारा (२) – धानुरी, माकणी**
**उमरगा (१) – दाळींब**

**तलाठी कार्यालये एकूण – १६**

**धाराशिव (१) – चिखली**
**तुळजापूर (९) – खुदावाडी, मूर्टा, सिंदगाव, दहिवडी, बोळेगाव, लोहगाव, केशेगाव, किळज, जळकोट.**
**उमरगा (३) – एकोंडी (ज.), चिंचोली, सुंदरवाडी,**
**लोहारा (३) – राजेगाव, जेवळी, मोघा.**

# आंदोरा येथे दोन घरफोड्या ; साडेचार लाखांचा मुद्देमाल लंपास

**कळंब** :- कळंब तालुक्यातील आंदोरा येथील दोन शेजारी घरांमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत तब्बल 4 लाख 54 हजार 145 रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत भिमराव नागनाथ काळे (वय 50, रा. आंदोरा ता. कळंब) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक 25 एप्रिल 2026 रोजी रात्री अज्ञात व्यक्तीने त्यांच्या तसेच शेजारील घरात प्रवेश केला. यावेळी सुमारे 51 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम 1 लाख रुपये व इतर सोन्याचे दागिने असा एकूण 4,54,145 रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. या प्रकरणी भिमराव काळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 331(4), 305(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# उमरग्यात गांजा बाळगणारा एकजण ताब्यात; 17 हजारांचा मुद्देमाल जप्त

**उमरगा** :- उमरगा येथील हुतात्मा स्मारक परिसरात अवैधरीत्या गांजा विक्रीसाठी बाळगणाऱ्या व्यक्तीवर उमरगा पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई २९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी करण्यात आली. याप्रकरणी आरोपी रामदास एकनाथ सूर्यवंशी (वय ६२, रा. तुरोरी, ता. उमरगा) याला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररित्या गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने ३४० ग्रॅम वजनाचा काळपट-हिरवट रंगाचा व उग्र वास असलेला अंमली पदार्थ जवळ बाळगून होता. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे १७ हजार रुपये इतकी आहे. उमरगा पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई करत आरोपीकडून गांजासह मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अंतर्गत कलम८(क), २०(ब)(ii)(अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**आरंभ मराठी** आमदार कैलास घाडगे-पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी


# केशर आंबा उत्पादकांना हेक्टरी 22,500 रुपयांची मदत जाहीर करा

**आरंभ मराठी । धाराशिव**

यावर्षी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि हवामानातील तीव्र बदलामुळे धाराशिव जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून, या शेतकऱ्यांना कोकणच्या धर्तीवर हेक्टरी २२,५०० रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी आमदार कैलास बाळासाहेब घाडगे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. आमदार घाडगे-पाटील यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, धाराशिव जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत केशर आंब्याची लागवड मोठ्या प्रमाणावर वाढली असून सध्या सुमारे साडेचार हजार हेक्टर क्षेत्रावर केशर आंब्याची लागवड आहे. येथील हवामान व भौगोलिक



परिस्थितीमुळे धाराशिवमधील केशर आंब्याला विशिष्ट चव व गोडवा प्राप्त झाला असून, काही शेतकरी निर्यातीसाठी देखील हा आंबा पाठवतात. त्यामुळे या पिकाला आर्थिकदृष्ट्या मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, यावर्षी बदलत्या हवामानाचा मोठा फटका आंबा बागांना बसला आहे. मोहर गळती, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ-उतार, फळमाशीचा वाढलेला प्रादुर्भाव तसेच काही ठिकाणी झालेली गारपीट यामुळे आंबा



उत्पादनात ८० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. परिणामी आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. या पार्श्वभूमीवर कोकणातील हापूस आंबा उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने हेक्टरी २२,५०० रुपयांची मदत जाहीर करून ती वितरित देखील केली आहे. मात्र धाराशिव जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही मदत जाहीर करण्यात आलेली नाही, ही बाब अन्यायकारक असल्याचे आमदारांनी निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील केशर आंबा गुणवत्ता केंद्राचे प्रमुख डॉ. संजय पाटील यांनी कृषी विभागाच्या पथकासह धाराशिव जिल्ह्यातील चार तालुक्यांतील आंबा बागांची पाहणी केली होती. या पाहणीत यावर्षी उत्पादनात किमान ५० टक्के घट होणार असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. त्यानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी नुकसान भरपाईसंदर्भात सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयाकडे पाठवला आहे. मात्र या अहवालावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करून, कोकणच्या धर्तीवर धाराशिव जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी २२,५०० रुपयांची मदत तातडीने जाहीर करावी, अशी मागणी आमदार घाडगे-पाटील यांनी केली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी फळबागेचा विमा घेतला आहे, अशा सर्व शेतकऱ्यांना सरसकट फळपीक विम्याचा लाभ मिळावा, यासाठीही शासनाने निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील शेतकरी या निर्णयाची आतुरतेने वाट पाहत असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतल्यास संकटात सापडलेल्या आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# पालकमंत्री आज धाराशिव दौऱ्यावर

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसह विविध कार्यक्रमाला लावणार हजेरी

**आरंभ मराठी । धाराशिव**

राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे आज महाराष्ट्र दिनी एक दिवसाच्या धाराशिव जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण, आरोग्य सेवा व पायाभूत सुविधांच्या उद्घाटनांसह महत्त्वाच्या आढावा बैठका या दौऱ्यात होणार आहेत. सकाळी ७.४० वाजता शासकीय विश्रामगृह, धाराशिव येथून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ते प्रयाण करतील. ७.५० वाजता तेथे आगमन होईल. सकाळी ८.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पार पडणार आहे. याचवेळी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे नवीन रुग्णवाहिकेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यानंतर सकाळी ९.०० वाजता नियोजन भवन येथे धाराशिव जिल्ह्यातील दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे व चार उपकेंद्रांचे ऑनलाईन उद्घाटन तसेच तलाठी व मंडळ कार्यालयांच्या इमारतींचे ऑनलाईन भूमिपूजन होणार आहे. सकाळी ९.३० वाजता खरीप हंगामपूर्व आढावा बैठक आयोजित



करण्यात आली असून, जिल्हा कृषी विभागाच्या तयारीचा आढावा घेतला जाणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. दुपारी १२.०० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जिल्हा वार्षिक योजनेतून खरेदी करण्यात आलेल्या नवीन वाहनांचे अनावरण मंत्री सरनाईक यांच्या हस्ते होईल. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे PCR-मॉलिक्युलर लॅब व स्किल लॅबचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दौऱ्याच्या पुढील टप्प्यात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून मोटारीने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण करून तेथे आगमन व अल्पविरामानंतर

# बुद्ध पौर्णिमा, कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनानिमित्त..

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.






या वर्षी १ मे च्या दिवशी सुवर्ण योग आला आहे. १ मे २०२६ रोजी एकाच दिवशी बुद्ध पौर्णिमा, कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन हे तीन उत्सव साजरे होत आहेत. विशेष बाब म्हणजे या उत्सवाचा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अतिशय जवळचा संबंध आहे. बाबासाहेबांनी लाखो अनुयायांसह बुद्ध धम्माचा स्वीकार केला आणि काळाच्या पडद्याआड गेलेले शांतीचे आणि अहिंसेचे उपासक तथागत गौतम बुद्ध साऱ्या जगाला नव्याने माहीत झाले. बाबासाहेबांनी अनेक लढे लढून आणि भारतीय राज्यघटनेत कलमांची तरतूद करून कामगारांना,मजुरांना आणि स्त्री पुरुष नोकरदारांना अनेक हक्क मिळवून दिले.तसेच महाराष्ट्र राज्याची निर्मिती बाबासाहेबांनी आणलेल्या भाषावार प्रांतरचनेच्या धोरणामुळे झाली.आणि म्हणून यावर्षी १ मे या दिवशीचा हा सुवर्णयोग तितकाच लक्षवेधक आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. बाबासाहेबांनी आम्हाला तथागत गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्म सांगितला.त्यामुळे बुध्दांचे तर्कसंगत विचार व विज्ञानवादी जीवनदृष्टी आम्हाला मिळाली.आदर्श जीवन जगण्यासाठी बाबासाहेबांनी २२ प्रतिज्ञा दिल्या.केवळ बाबासाहेबांमुळे तथागत गौतम बुद्धांचे उपासक होण्याचा सन्मान मिळाला.तथागत गौतम बुद्ध यांची आज १ मे ला जयंती आहे.राजवैभव व अलिशान जीवन शैलीचा त्याग करून सिध्दार्थ गौतम ज्ञानप्राप्तीसाठी एका महाबोधी पिंपळ वृक्षाखाली बसले होते. तथागतांना ज्ञान प्राप्ती झाली आणि त्यांनी पहिले प्रवचन सारनाथ येथे दिले. मानवाच्या दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे.तृष्णा म्हणजे कधीच न शमनारी वासना होय.असे तथागतांनी निक्षून सांगितले. तथागत गौतम बुद्धांनी त्यांच्या प्रवचनात सांगितलेले त्रिशरण,पंचशील आणि अष्टांग मार्ग मनुष्य जीवनासाठी कवचकुंडले आहेत.तथागतांचा बुद्ध धम्म हा विज्ञाननिष्ठ असून तो स्वातंत्र्य, समता,बंधुता आणि न्याय यांचा पुरस्कार करतो.बुध्दाचा धम्म शांतीची, अहिंसेची,सम्यक जिवन मार्गाची शिकवण देतो.गौतम बुद्धांचे विचार आत्मसात करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचे सोने व्हायला वेळ लागत नाही.बुध्द पौर्णिमेच्या निमित्ताने बुद्धांना कोटी कोटी वंदन! दरवर्षी १ मे च्या दिवशी जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.कारण याच दिवशी कामगारांच्या विविध हक्कांसाठी व सन्मानासाठी वेगवेगळ्या देशांत विविध आंदोलने झाली.म्हणून १ मे ला काही देशांत सुट्टी जाहीर करण्यात आली. परंतु,भारतातील कामगारांचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार चळवळीचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील कामगार,मजूर आणि नोकरदार यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. बाबासाहेबांनी केवळ आठ तासांच्या नोकरीचा कायदा आणला.या कायद्यामुळे कामगारांची,नोकरदारांची व मजुरांची गुलामी,शोषण व हेळसांड हे सर्व प्रकार कायमचे बंद झाले.किमान वेतन तरतूद,हक्काची साप्ताहिक सुट्टी, भविष्य निर्वाह निधीची तरतूद,विविध रजा प्रकार,महिला कामगारांना व नोकरदार स्त्रियांना भरपगारी प्रसुती रजा,बालसंगोपन रजा ही सगळी व्यवस्था बाबासाहेबांनी आमंलात आणली आहे.म्हणून कामगार दिन साजरा करताना समस्त कामगारांनी, मजुरांनी आणि नोकरदारांनी न विसरता बाबासाहेबांच्या चरणी नतमस्तक झाले पाहिजे.सर्व कामगारांना व नोकरदार स्त्री पुरुषांना कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! मराठी भाषिक राज्याची अर्थात महाराष्ट्र राज्याची मागणी करणारी संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४६ पासून सुरू झाली होती.तेव्हापासून ते १९६० पर्यंत अनेक स्थित्यंतरे झाली,विविध लढे उभारले गेले,अनेक चळवळीच्या माध्यमातून मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी म्हणून अनेक राजकीय नेत्यांनी, उद्योजकांनी,लेखकांनी,कवींनी, विचारवंतांनी,शाहिरांनी शर्थीचे प्रयत्न केले.६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथील सभेत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली.या समितीने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अखेरचा व निर्णायक लढा उभा केला.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. म्हणून १ मे ला महाराष्ट्रातील आपण जनता महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो.महाराष्ट्र राज्याची निर्मिती भाषावार प्रांतरचनेच्या धोरणामुळे झाली.पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'एका राज्याची भाषा एकच असावी' ही संकल्पना दार कमिशनला सादर केली होती.हेच धोरण पुढे राज्य निर्माण करण्यासाठी आमंलात आणले गेले.

आज महाराष्ट्र दिन साजरा करताना आपणास महाराष्ट्र राज्याचा किती अभिमान वाटतो.आपला महाराष्ट्र संताची भुमी म्हणून ओळखले जाते.रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदिप्यमान इतिहासाचा देश,महात्मा ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले,राजर्षी शाहू महाराज,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अशा अनेक महामानवांच्या,विचारवंतांच्या व समाजसुधारकांच्या कार्यक्षेत्राचे महान राष्ट्र म्हणून महाराष्ट्र राज्य साऱ्या जगात नावारूपाला आले आहे.आपले महाराष्ट्र राज्य आज अनेक क्षेत्रांत आघाडीवर आहे.महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. विविधतेने नटलेल्या महाराष्ट्र राज्याचे आपण रहिवासी आहोत ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. समस्त महाराष्ट्रीयन जनतेला महाराष्ट्र दिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

# प्राचीन तगर (तेर) : बुद्धांच्या समतेच्या विचारांचे ऐतिहासिक केंद्र

सुमेध भिवाजी वाघमारे
तेर
८७८८५७४३८३





धाराशिव तालुक्यातील सध्याचे तेर व २००० वर्षांपूर्वीचा तगर शहर या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. आजही येथे उभा असणारी देवालये याची साक्ष देत आहेत. प्राचिन काळी तगर शहर हे बुद्ध धम्माचा प्रचार प्रसाराचे केंद्र होते हे इतिहास सांगतोय. प्राचिन काळी तेरमध्ये तथागत गौतम बुद्धांचा समतेचा विचार देत मानवाच्या कल्याणासाठी प्रज्ञा शिल करुणेची शिकवण दिली जात होती. हे सिद्ध झाले आहे त्यामुळे प्राचिन काळी तेर मध्ये बुद्धांचा समतेचा संदेश मानवी कल्याणासाठी दिला जात होता याबाबत शंका नाही. वैदिक धर्मानंतर दक्षिणेत लोकप्रियता लाभलेला धम्म म्हणजे बुद्ध धम्म होय. गौतम बुध्दाने सर्वसामान्य जनतेला साध्या व सोप्या भाषेत जीवनविषयक निश्चित तत्त्वज्ञान सांगून मोक्षप्राप्तीची द्वारे खुली केल्यामुळे या धर्माचा प्रसार झपाट्याने दक्षिणेत झाला. त्याने बुद्ध धर्मप्रसारार्थ विविध धर्मप्रसारक पाठविले. महाराष्ट्रात महाधर्मरक्षित या बुद्ध भिखुला पाठवले होते. मध्य प्रदेशातील सांची स्तूपाच्या तोरणावरील आलेखात दक्षिणेतील 'ताकारापद' या प्रशासकीय घटकांचा उल्लेख मौर्यकालीन तगरवर प्रकाश टाकतो. तेर येथे हस्तीदंताचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत होता. तेथील हस्तीदंतकाराच्या श्रेणीने देणगी दिली असा उल्लेख सांचीच्या तोरणावर आढळतो. तेर परिसरातील बुद्ध धम्माच प्रसार यामुळे स्पष्ट होतो.बुद्ध भिक्षूंच्या संख्येत वाढ झाल्याने त्यांच्या निवासासाठी गुहा, लेण्या, विहार, चैत्यगृह, स्तूप बांधले गेले. सातवाहन काळात बुध्द धम्माच प्रसार झपाट्याने झाला. सातवाहन राजांनी बुद्ध भिक्षूंना त्यांच्या निर्वाहासाठी जमीनी, गावे दान केली तसेच व्यापारी व भिन्न श्रेणींनी दान केल्याचे उल्लेख आढळतात. तेरही यास अपवाद नव्हते.याबाबत सविस्तर वृत्त असे की उस्मानाबाद तालुक्यातील तेर हे दोन हजार वर्षांपूर्वी ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय बाजारपेठ होती. या ठिकाणावरून विदेशात व्यापार चालत असे असे संशोधनातून समोर आले आहे. तेर मध्ये सर्व प्रथम उत्खनन करण्यात आली तसेच 1968 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने मोरश्वर दिक्षित यांनी तेर येथे उत्खनन करत असताना मोठ्या आकाराच्या बुद्ध स्तूपाच्या आकाराच्या अर्धवर्तुळकृती पृष्ठभाग असलेल्या बौद्ध स्तुपाचे अवशेष या उत्खननात सापडले. प्राचिन ऐतिहासिक काळात तेर हे बुद्ध धम्माच मोठे केंद्र होते असे सिद्ध झाले. या काळात तेर मध्ये गौतम बुद्धांचा समतेचा विचार नांदत होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.या बुद्ध स्तूपाचा वैशिष्ट्य असे होते – स्तुपाचे बांधकाम विटांचे होते, स्तुपाचा व्यास 95 फूट होते. स्तुपाची बांधणी मोठ्या चक्रात तर दुसरे चक्र लहान अशी होते. मोठ्या चक्राला सोळा तर आतिल लहान चक्राला आठ आरे होते. आतिल चक्राच्या मध्यभागी नाभिस्वरूपी चौरस रचना असून ते विटांच्या चैतीस थरांनी उभारली होती. वर्तुळाचा परिघ आणि विटांनी केलेले आरे यामधील जागा माती टाकून भरलेली होती. स्तूपाचे बाहेरील वर्तुळ ५.३० मी. रुंदीचे असून त्याबाहेरील बांधकाम विटांचे आहे. स्तूपाच्या बाहेरील वर्तुळाच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार दिशांना अनुलक्षून ५ मी. लांबीचे व दीड मी. रुंदीचे चबुतरे विटांनी बांधलेले होते. या प्रत्येक चबुतर्यावर 'आयकस्तंभ' उभारण्याची पद्धत होती. स्तूपाच्या घुमटाचा बाह्य किंवा दर्शनी भाग शिल्पांनी अलंकृत केलेल्या फरशांनी मढविलेला असावा. सध्या या फरशा उध्वस्त स्थितीत आढळल्या. स्तूपाच्या बाह्यभागाप्रमाणे स्तूपाभोवतालच्या प्रदक्षिणेच्या मार्गावर फरशा बसविलेल्या होत्या. स्तूपाच्या घुमटाचे २९ तुकडे शाबूत अवस्थेत उत्खननात आढळले. स्तूप उध्वस्त झालेला असल्याने धातू किंवा पवित्र अवशेष ठेवलेला करंडक किंवा मंजूषा सापडली नाही, मात्र इतरत्र स्फटिक, पुष्पराग इ. दगडांचे मणी आढळले. ते मंजूषेत इतर अवशेषांबरोबर ठेवलेले असावेत. स्तूपाच्या सभोवती असलेल्या प्रदक्षिणापथावर पुलुमावी (इ.स. २रे शतक) या सातवाहन राजाचे नाणे सापडले.या स्तूप बांधणीचा काळ इ.स. १२० ते इ.स. १४० असा ठरवतो. इतर सातवाहन राजांप्रमाणेच पुलुमावीने या स्तूप उभारणीत सक्रीय सहाय्य केले असावे. दुदैवाने विटकरी शेतातून अनेकांनी विटा नेल्यामुळे व अवशेषांचे जतन न केल्याने तेर मध्ये त्या काळी बौद्ध प्रसाराचे केंद्र होते हे सांगणारे पुरावे नष्ट होत आहेत.

# कामगारांच्या हक्काचा दिवस




१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधान न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या


१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन


या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, ' कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.' लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# चला साजरा करूया तो दिवस, जेव्हा महान महाराष्ट्राला राज्याचा दर्जा मिळाला

राजेश्वरी गायकवाड
छत्रपती संभाजी नगर






महाराष्ट्र दिन १ मे रोजी साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी बॉम्बे पुनर्गठन कायदा १९६० अंतर्गत महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली. या कायद्याने द्विभाषिक बॉम्बे राज्याचे विभाजन करून मराठी भाषिक महाराष्ट्र आणि गुजराती भाषिक गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.हा दिवस विशेष आहे कारण तो मराठी भाषिक लोकांच्या भाषिक आणि सांस्कृतिक ओळखीचा सन्मान करतो आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील बलिदानांची आठवण करून देतो.

**संयुक्त महाराष्ट्र आंदोलन**

या आंदोलनाने मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मागणी केली. या संघर्षात १०६ हुतात्म्यांनी आपले प्राण अर्पण केले. महाराष्ट्र दिन हा त्यांच्या बलिदानाचे स्मरण आणि सन्मान करण्याचा दिवस आहे."जय महाराष्ट्र" हा राज्याच्या अभिमानाचे आणि एकतेचे प्रतीक असलेला लोकप्रिय घोषवाक्य आहे. याचा अर्थ "महाराष्ट्राचा विजय असो" असा होतो.

**महाराष्ट्राचे जुने नाव**

प्राचीन ग्रंथ आणि शिलालेखांमध्ये महाराष्ट्राला महरट्ट, महाराष्ट्र-देश आणि मीरूट अशा नावांनी ओळखले जात असे. १९६० पूर्वी हा प्रदेश बॉम्बे स्टेट आणि ब्रिटिश काळात बॉम्बे प्रेसिडेन्सी म्हणून ओळखला जात होता. महाराष्ट्र हे पश्चिम भारतातील एक महत्त्वाचे राज्य आहे, ज्याची राजधानी आणि आर्थिक केंद्र मुंबई आहे. हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले आणि तिसऱ्या क्रमांकाचे क्षेत्रफळ असलेले राज्य आहे.

**संस्कृती आणि परंपरा**

महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध आहे. सातवाहन राजवंश आणि मराठा साम्राज्य यांचा इतिहास गौरवशाली आहे. गणेश चतुर्थी सारखे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

शाळा, महाविद्यालये आणि समाजांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लावणीसारखे लोकनृत्य, संगीत आणि नाट्यप्रयोग सादर केले जातात.

**खाद्यसंस्कृती**

वडापाव, पावभाजी यांसारखे स्ट्रीट फूड तसेच पुरणपोळी आणि मोदक यांसारखे पारंपरिक पदार्थ प्रसिद्ध आहेत.

**समारंभ आणि सन्मान**

* ध्वजारोहण शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये केले जाते
* मुंबईत भव्य परेड आयोजित केली जाते
* हुतात्मा स्मारक येथे शहीदांना श्रद्धांजली वाहिली जाते
* राज्यासाठी विशेष योगदान देणाऱ्यांचा सन्मान केला जातो

**पहिला अधिकृत समारंभ**

१ मे १९६० रोजी मुंबईतील राजभवन येथे पहिला अधिकृत समारंभ झाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि राज्यपाल श्री प्रकाश यांच्या उपस्थितीत राज्याचा नकाशा अनावरण केला.

**नेतृत्व**

या आंदोलनाचे नेतृत्व केशवराव जेधे, एस. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे आणि प्रल्हाद केशव अत्रे यांनी केले.

शासकीय उपक्रम आणि जनजागृती

या दिवशी नवीन योजना, धोरणे आणि विकास प्रकल्पांची घोषणा केली जाते. हा दिवस लोकांना राज्याच्या निर्मितीची आणि लोकशाही हक्कांची आठवण करून देतो.

**अधिकृत सुट्टी**

महाराष्ट्र दिन हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे.

**कामगार दिन (Labour Day )**

१ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन देखील आहे. कामगारांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळीचे स्मरण या दिवशी केले जाते. १८८६ साली अमेरिकेत सुरू झालेल्या संपाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

हा दिवस कामगारांच्या योगदानाचा सन्मान करतो आणि योग्य वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि ८ तासांच्या कामाच्या हक्कासाठी झालेल्या संघर्षाची आठवण करून देतो.

महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

चला एकत्र येऊया — जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv ( Maharashtra ).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

## माडज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



आरंभ मराठी । माडज

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती माडज येथे मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात युवक-युवती, महिलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांचा समाजात प्रसार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माडसगावच्या सरपंच सौ. सारिका पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून राजकुमार निकाळजे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. शितल चव्हाण यांच्या हस्ते झाले. तसेच सामाजिक कार्यकर्ते मंगेश भाई सोनकांबळे, लातूरचे नगरसेवक, राजेंद्र सुरवसे, अंबरनाथ टाइम्सचे संतोष सुरवशे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष व माजी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. जयंती समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच भीमसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## भूम येथे आज शिक्षकांचा गौरव; आमदार डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

आरंभ मराठी । भूम

महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने भूम येथे आज (दि.१) शिक्षकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. पंचायत समिती सभागृहात आयोजित या कार्यक्रमात आदर्श शिक्षकांना "शिक्षक गौरव पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार डॉ. तानाजी सावंत उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते शिक्षकांचा गौरव केला जाणार आहे. कार्यक्रमास पंचायत समितीच्या सभापती पूजा ढगे, उपसभापती प्रियांका रणबागूल तसेच शिक्षण अधिकारी धाराशिव रवींद्र खंदारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा उपक्रमांतर्गत तसेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरणार आहे. दुपारी १ वाजता होणाऱ्या या समारंभास जिल्हा परिषद सदस्य शुभांगी देशमुख, विजयमला मारकड, साधना अंधारे, जयश्री काळे, अमोल भोरे यांच्यासह पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, कृष्णा गोयकर, प्रशांत मुंडेकर, प्रदीप शेळके, प्रियंका गटकळ, साधना सोबुगडे, श्रीलता लोखंडे, मनोज अंधारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या गौरव सोहळ्यास भूम तालुक्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी यांनी केले आहे.

## एनएमएमएस परीक्षेत ढोकी येथील ईश्वरी वाकुरे जिल्ह्यात प्रथम

आरंभ मराठी । ढोकी



नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत ईश्वरी धनंजय वाकुरे हिने १५३ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तर चैत्राली नितीन वाघे हिने १२५ गुणांसह अनुसूचित जाती प्रवर्गातून जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवून यशाचे शिखर गाठले. या यशानिमित्त ढोकी येथील आयडियल कोचिंग क्लासेसमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. विशेष बाब म्हणजे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या आई-वडिलांच्या हस्ते करण्यात आला. या परीक्षेत यशस्वी ठरलेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. कार्यक्रमात पालकांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या यशासाठी शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. या प्रसंगी दौलत गाढवे, धनंजय वाकुरे, नितीन वाघे, गणेश सोमाणी यांच्यासह अनेक पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर खरेदीसाठी 3.15 लाखांचे अनुदान

**धाराशिव** :- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांच्या पुरवठ्याची महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. पात्र बचत गटांना कृषी व्यवसायासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेंतर्गत बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित बचत गट नोंदणीकृत असावा आणि त्याचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे बंधनकारक आहे. या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या आणि योजनेंतर्गत निवड झालेल्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर तसेच त्याची उपसाधने (कल्टीव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर) खरेदीसाठी कमाल ३.१५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक व पात्र अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचत गटांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, धाराशिव येथे ३० जून २०२६ पर्यंत ऑफलाईन अर्ज सादर करावेत. अर्जासोबत सर्व सदस्यांचे जातीचे दाखले, आधार कार्ड व रहिवासी दाखले ही आवश्यक कागदपत्रे कार्यालयीन वेळेत जमा करणे आवश्यक आहे.अधिकाधिक पात्र बचत गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण सचिन कवले यांनी केले आहे.

# तुळजापूर तालुक्यात ऊसावर 'कानिकवळी' बुरशीचा प्रादुर्भाव; शेतकरी दुहेरी संकटात

## खोडवा ऊस धोक्यात, लाखोंचा खर्च वाया जाण्याची भीती

गणेश गायकवाड । आरंभ मराठी

**तामलवाडी : तुळजापूर तालुक्यात गतवर्षी व चालू वर्षात झालेल्या मुबलक पावसामुळे ऊस लागवडीच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. पाण्याची उपलब्धता मुबलक प्रमाणात असल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केली. मात्र, या वाढत्या लागवडीसोबतच आता शेतकऱ्यांसमोर 'कानिकवळी' या बुरशीजन्य रोगाचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. विशेषतः खोडवा ऊस उत्पादक शेतकरी या रोगामुळे मोठ्या अडचणीत सापडले आहेत.**





तुळजापुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये खोडवा ऊसावर 'कानिकवळी' बुरशीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या निरीक्षणानुसार आणि कृषी तज्ज्ञांच्या प्राथमिक माहितीनुसार, ८००५ या ऊस वाणामध्ये या बुरशीचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात होत आहे. या रोगामुळे ऊसाच्या वाढीवर विपरीत परिणाम होत असून उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खोडवा ऊसासाठी लागणारा खर्च हा नव्या ऊस लागवडीइतकाच असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. मशागत, रासायनिक व सेंद्रिय खतांचा वापर, औषध फवारणी, तसेच मजुरी यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. मात्र, वाढत्या रोगप्रादुर्भावामुळे अपेक्षित उत्पादन मिळेल की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडले असून लाखो रुपयांचा खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे. 'कानिकवळी' बुरशीमुळे ऊसाची वाढ खुंटणे, कांड्या कमकुवत होणे, तसेच वजनात लक्षणीय घट होणे असे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. काही भागांमध्ये तर संपूर्ण पट्ट्यांमध्ये रोगाचा फैलाव झाल्याचे आढळून आले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने तात्काळ शेतपातळीवर पाहणी करून परिस्थितीचा आढावा घ्यावा, तसेच शेतकऱ्यांना योग्य व तातडीचे मार्गदर्शन करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. बुरशी नियंत्रणासाठी आवश्यक औषधे, फवारणीचे योग्य वेळापत्रक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत स्पष्ट सूचना देणे अत्यावश्यक असल्याचे शेतकरी सांगत आहेत. दरम्यान, कृषी तज्ज्ञांच्या मते, योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने रोगनियंत्रण उपाययोजना केल्यास नुकसान काही प्रमाणात टाळता येऊ शकते. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर माहिती मिळणे आणि योग्य औषधांचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. एकीकडे वाढलेले लागवड क्षेत्र आणि दुसरीकडे वाढता 'कानिकवळी' बुरशीचा प्रादुर्भाव यामुळे तुळजापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत.

### पाच फूट उंचीचा ऊस मोडावा लागला

गेल्या वर्षी मी पाच एकर उसाची लागवड केली होती. त्याचे उत्पादन चांगले मिळाले. मात्र, खोडव्या ऊसाला यंदा प्रचंड 'कानिकवळी' झाली आहे. पाच फूट उंचीचा ऊस आम्हाला मोडावा लागला. त्यामुळे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

**बालाजी शिंदे,**
शेतकरी, पांगरदरवाडी.

## मुरुड उपजिल्हा रुग्णालयाला 'छत्रपती संभाजी महाराज' यांचे नाव देण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर



आरंभ मराठी । मुरुड



मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालयाला 'छत्रपती संभाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय' असे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मुरुड ग्रामसभेत मांडण्यात आला असता तो बहुमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयाचे परिसरात स्वागत होत असून, शासनाने त्वरित या ठरावाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. मुरुड हे सुमारे ४० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेले शहर असून, आजूबाजूच्या ५० ते ६० खेड्यांचा दैनंदिन संपर्क या शहराशी आहे. त्यामुळे आरोग्य सेवा दृष्टीने मुरुडचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. यापूर्वी ग्रामीण रुग्णालय म्हणून कार्यरत असलेली ही संस्था आता उपजिल्हा रुग्णालय म्हणून विकसित होत असून, अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशी भव्य नवीन इमारत उभारली जात आहे. या पार्श्वभूमीवर, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना मानसिकदृष्ट्या प्रेरणा व आधार मिळावा तसेच महाराष्ट्राच्या इतिहासाची जाणीव व्हावी, या उद्देशाने छत्रपती संभाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. अखेर ग्रामसभेने या मागणीला मान्यता दिली आहे. ग्रामसभेचा ठराव आता प्रशासनामार्फत शासनाकडे पाठविण्यात येणार असून, संबंधित विभागाने यास लवकरात लवकर मंजुरी देऊन नामकरणाचा निर्णय अधिकृत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पालकमंत्र्यांनी तात्काळ निर्णय घ्यावा

योगायोग म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांचे वंशज शिवेंद्रसिंह राजे भोसले महाराज हे सध्या लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे ऐतिहासिक परंपरेशी नाळ जुळलेली असताना मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालयाचे 'छत्रपती संभाजी महाराज' यांच्या नावाने नामकरण करण्यासाठी त्यांनी तात्काळ पुढाकार घ्यावा. ग्रामसभेने लोकशाही पद्धतीने बहुमताने घेतलेला निर्णय हा जनतेच्या भावना व्यक्त करणारा आहे. त्यामुळे पालकमंत्र्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन आरोग्य विभागास आवश्यक त्या सूचना देऊन नामविस्ताराचा प्रस्ताव तातडीने मंजूर करून घ्यावा.

**दत्ता नाडे**
सामाजिक कार्यकर्ते.

## धाराशिवमध्ये आधार अपडेट व UDID पडताळणीसाठी ५ मे रोजी विशेष शिबिर

आरंभ मराठी । धाराशिव

संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेतील अनेक लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरणाच्या अडचणींमुळे अनुदान मिळण्यात अडथळे येत आहेत. विशेषतः काही लाभार्थ्यांचे हाताचे ठसे किंवा डोळ्यांचे स्कॅन होत नसल्यामुळे आधार अपडेट प्रक्रिया पूर्ण होत नाही. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेत, लाभार्थ्यांच्या सोयीसाठी विशेष शिबिराचे आयोजन केले आहे. तहसील कार्यालय, धाराशिव येथे दिनांक ५ मे २०२६ रोजी आधार अपडेट आणि UDID (Unique Disability ID) पडताळणीसाठी विशेष शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये अशा लाभार्थ्यांचे आधार अपडेट करण्यात येणार असून, ज्यांना आधार लिंक नसल्यामुळे किंवा प्रमाणीकरण न झाल्यामुळे अनुदान मिळण्यात अडचणी येत आहेत, त्यांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, ज्या दिव्यांग लाभार्थ्यांनी अद्याप UDID प्रमाणपत्र ऑनलाईन काढलेले नाही, त्यांच्यासाठीही या शिबिरात मार्गदर्शन व पडताळणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रशासनाने सर्व संबंधित लाभार्थ्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक यांसारखी आवश्यक कागदपत्रे सोबत आणून शिबिराचा लाभ घ्यावा. याशिवाय, धाराशिव तालुक्यातील लोकप्रतिनिधींनाही प्रशासनाने सहकार्याचे आवाहन केले आहे. आपल्या भागातील संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेतील पात्र लाभार्थ्यांपर्यंत या शिबिराची माहिती पोहोचवून जनजागृती करण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडावी, असे आवाहन तहसीलदार डॉ मृणाल जाधव यांनी केले आहे.

## सेवापूर्तीनिमित्त तानाजी मारवाटकर यांचा भव्य गौरव सोहळा

**तेर** :-धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक (स्पेशल) शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक तानाजी मारवाटकर यांचा सेवानिवृत्ती निमित्त सेवा गौरव सोहळा गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल थोडसरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ निवृत्त शिक्षक भागवत नाईकवाडी, संतोष देशपांडे, तालुका शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष शेषेराव राठोड, समितीच्या उपाध्यक्षा जान्हवी सौदागर, पेठ शाळेच्या मुख्याध्यापिका पवार, तसेच बी. बी. चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व संत गोरोबाकाका यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मारवाटकर यांनी तब्बल ३७ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावत ३० एप्रिल रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. यावेळी तानाजी मारवाटकर व त्यांच्या अर्धांगिनी अरुणा मारवाटकर यांचा शाल, श्रीफळ, फेटा व वस्त्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध शाळांच्या वतीनेही त्यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी, भाग्यश्री आंधळे, नामदेव कांबळे, माजी उपसरपंच भारत नाईकवाडी, नाना मारवाटकर, नेताजी फंड यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरंभ मराठी

### शासकीय स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास विरोध केल्यामुळे संताप

# अंत्यसंस्कारावरून तणाव: मृतदेह 5 किमी दूर नेण्याची वेळ

आरंभ मराठी । मुरुड





लातूर तालुक्यातील करकट्टा येथे अंत्यसंस्काराच्या ठिकाणावरून गंभीर तणाव निर्माण झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि.२९) उघडकीस आली. या प्रकारामुळे गावात संतापाचे वातावरण असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. गावातील शिवराज श्रीधर शिंदे (वय ३८) यांचा काही दिवसांपूर्वी मोटारसायकल अपघात झाला होता. त्यानंतर लातूर येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र मंगळवारी सायंकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी नातेवाईकांनी करकट्टा गावालगत गट क्रमांक २५५/२ मधील शासकीय स्मशानभूमीची निवड केली. ही जागा २०२३ मध्ये सार्वजनिक स्मशानभूमी म्हणून अधिकृत करण्यात आली असून त्याची सातबारा उताऱ्यावर नोंद आहे. तरीही काही नागरिकांनी या ठिकाणी अंत्यसंस्कारास विरोध दर्शविला. रात्रभर चर्चा सुरू राहिल्यानंतर बुधवारी सकाळी नातेवाईकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अंत्यविधी करण्याची तयारी केली. मात्र गावातील काहींनी स्मशानभूमीतच अंत्यसंस्कार करण्याचा आग्रह धरल्याने पार्थिव तेथे नेण्यात आले. परंतु तेथे पुन्हा विरोध झाल्याने अंत्यविधीची प्रक्रिया थांबवावी लागली. या संपूर्ण घटनेदरम्यान मुरुड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. तरीही अंत्यसंस्कारास अडथळा आणणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, अद्याप कोणत्याही व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले; मात्र वाद न सुटल्याने अखेरीस नातेवाईकांना सुमारे पाच किलोमीटर दूर दुसऱ्याच्या पडीक शेतात अंत्यसंस्कार करावे लागले. कडक उन्हात पार्थिव नेण्याची वेळ आल्याने हा प्रकार अमानवी असल्याची भावना व्यक्त होत आहे. या घटनेमुळे गावातील सामाजिक सलोखा धोक्यात आला असून, संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भूम नगर परिषदेतील भ्रष्टाचाराविरोधात १५ नगरसेवकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

आरंभ मराठी । धाराशिव

भूम नगर परिषदेतील अनियमितता, भ्रष्टाचार व मनमानी कारभाराच्या विरोधात जनशक्ती शहर विकास आघाडीच्या १५ नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेत गुरुवारी (दि.३०) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. याबाबत अगोदर निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे. नगरसेवकांनी दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा नगर प्रशासन अधिकाऱ्यांकडे विविध गंभीर मुद्द्यांवर सविस्तर निवेदन सादर केले होते. मात्र, त्या निवेदनाची अद्याप दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. नगरसेवकांनी सादर केलेल्या निवेदनात अनेक आर्थिक व प्रशासकीय अनियमिततेचे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत घनकचरा




व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणाची चौकशी करून संबंधित देयके थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रभारी मुख्याधिकारी प्रवीण जाधव यांनी दलितेत्तर वस्ती सुधार योजना (२०२४-२५) व सुवर्ण जयंती नागरोत्थान योजनेअंतर्गत कामांना सर्वसाधारण सभेचा ठराव न घेता परस्पर प्रशासकीय मान्यता दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही कामे रद्द करून नव्याने ठरावाद्वारे मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२२-२३ अंतर्गत कसबा क्रीडांगण विकास कामामध्ये मुदत संपल्यानंतरही नियमबाह्य देयके देण्यात आल्याचा आरोप करत तत्कालीन मुख्याधिकारी, नगर अभियंता व लेखापाल यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान योजनेअंतर्गत ११४ कोटी रुपयांच्या सिमेंट रस्ते कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, चौकशीअंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे. या सर्व तक्रारींकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत, जनशक्ती शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. या लाक्षणिक उपोषणात उपनगराध्यक्ष सौ. लक्ष्मी साठे, गटनेते रुपेश शेंडगे, अनिल शेंडगे, नवनाथ रोकडे, रामराजे कुंभार, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड, विठ्ठल बागडे, शमशाद हरून मुजावर, शीतल अमोल गाडे, चंद्रकला हरिश्चंद्र पवार, सुनिता गणेश वीर, नूरजहाँ महंमद इसार मणियार आणि सुरेखा दत्तात्रय काळे हे नगरसेवक सहभागी झाले होते.

# वाशी पोलिसांकडून चोरीची मोटारसायकल जप्त

## एक आरोपी ताब्यात, दुसरा फरार



आरंभ मराठी । वाशी

वाशी पोलीस स्टेशनच्या पथकाने रात्रीच्या गस्तीदरम्यान चोरीची मोटारसायकल जप्त करत एका आरोपीस ताब्यात घेतले असून दुसरा आरोपी फरार झाला आहे. बुधवारी (दि.29) रात्रीच्या सुमारास पोलीस निरीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत असताना पिंपळगाव पाटी परिसरात विनानंबर प्लेट असलेल्या मोटारसायकलवर दोन इसम संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना थांबविण्याचा इशारा केला असता त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलीस पथकाने तत्काळ पाठलाग करून मोटारसायकल अडवली. यावेळी एक आरोपी ताब्यात घेण्यात आला, तर दुसरा आरोपी अंधाराचा फायदा घेत फरार झाला. ताब्यात घेतलेल्या आरोपीने आपले नाव भागवत पंजा शिंदे असे सांगितले असून फरार आरोपीचे नाव बबलू रामा शिंदे असल्याचे समोर आले आहे. तपासादरम्यान संबंधित मोटारसायकल आंबेजोगाई शहर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक 150/2026, कलम 303(2) बी.एन.एस. अंतर्गत चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आरोपीसह जप्त मोटारसायकल पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आंबेजोगाई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

# पारगाव शाळेच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना राज्यस्तरीय पथकाची दाद

आरंभ मराठी । वाशी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पारगाव येथे राज्यस्तरीय पथकाने भेट देऊन शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी केली. या पथकामध्ये सातारा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्ताराधिकारी सुधाकर कोल्हे, केंद्रप्रमुख मोहिते साहेब, ग्रामसेवक तसेच शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांचा समावेश होता. भेटीदरम्यान पथकाने शाळेतील शैक्षणिक, भौतिक व डिजिटल सुविधांची बारकाईने पाहणी केली. यामध्ये डिजिटल वर्ग, संगणक लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, कार्यानुभव लॅब, स्वच्छ व सुस्थितीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच



हिरवागार व आकर्षक परिसर यांचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, प्रयोगशील शिक्षणपद्धती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी केलेले प्रयत्न पाहून पथकाने समाधान व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक मोटे सर तसेच शिक्षकवृंद यांच्या मेहनतीचे आणि नाविन्यपूर्ण कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. शाळेची गुणवत्ता, स्वच्छता, व्यवस्थापन आणि आधुनिक सुविधांमुळे उपस्थित अधिकारी प्रभावित झाले. या भेटीमुळे शाळेच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळाली असून भविष्यातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अशाच उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. शाळेच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आपले सरकार' सेवा केंद्राची साईट ठप्प; RTE व MPSC चे अर्ज करताना अडचणी

आरंभ मराठी । धाराशिव

मागील आठ ते दहा दिवसांपासून 'आपले सरकार सेवा केंद्र'ची साईट बंद असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे सध्या RTE प्रवेश प्रक्रिया सुरू असून त्याचा गुरुवारी शेवटचा दिवस होता. त्याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-ब परीक्षेसाठी अर्ज करण्याचाही गुरुवारी शेवटचा दिवस असल्याने विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारी योजनांसाठी तसेच विविध शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांच्या अर्जांसाठी आवश्यक असणारी रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे मिळविण्यासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' हा सर्वसामान्यांसाठी प्रमुख व एकमेव पर्याय असतो. मात्र हीच सेवा मागील काही दिवसांपासून ठप्प झाल्यामुळे हजारो अर्जदार अडचणीत सापडले आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीचे चार दिवस महसूल कर्मचाऱ्यांच्या संपामुळे सेवा बंद होती. संप मागे घेतल्यानंतर केवळ एक दिवस साईट सुरू झाली; मात्र त्यानंतर साईट अपडेटच्या कारणास्तव पुन्हा चार दिवसांपासून सेवा बंद ठेवण्यात आली आहे. परिणामी, नागरिकांना ना अर्ज करता येत आहेत ना आवश्यक कागदपत्रे मिळत आहेत. दरम्यान, अनेक विद्यार्थी व पालकांनी नाराजी व्यक्त करत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. महत्त्वाच्या कालावधीतच साईट बंद ठेवणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा साखर कारखान्यात अभ्यास दौरा

## सौर ऊर्जेच्या प्रकल्पांची घेतली सखोल माहिती



आरंभ मराठी । धाराशिव

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर साखर कारखान्यास शैक्षणिक अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी औद्योगिक प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेत विविध प्रकल्पांची सखोल माहिती जाणून घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने, अकॅडमिक डीन तथा विभाग प्रमुख डॉ. डी. डी. दाते यांच्या मार्गदर्शनाखाली या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा या सहलीत उत्स्फूर्त सहभाग होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी साखर निर्मिती प्रकल्प, पारंपारिक ऊर्जा प्रकल्प, को-जनरेशन तसेच डिस्टिलरी प्रकल्पांची माहिती घेतली. कारखान्यातील इंजिनियर अनिकेत भोरे व इंजिनियर सुरवसे यांनी विविध यंत्रणा आणि उत्पादन प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी केशेगाव येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पालाही भेट देत अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांची माहिती घेतली. यावेळी इंजिनियर जगदाळे यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाची कार्यपद्धती समजावून सांगितली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. माने यांनी सांगितले की, सौर ऊर्जा हा भविष्यातील महत्त्वाचा आणि वाढता ऊर्जा स्त्रोत असून त्याचा योग्य वापर करणारा देशच जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकतो. दरम्यान, महाविद्यालयात लवकरच सौर ऊर्जा प्रकल्प उभारून त्याचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाणार असल्याची माहितीही देण्यात आली. या शैक्षणिक सहलीचे नियोजन प्रा. आर. डी. गुरव, प्रा. टेकाळे पाटील, प्रा. एस. पी. बिरादार, प्रा. एस. डी. शिंदे आणि श्री. विराज पाटील यांनी केले.

# तुळजापूरमध्ये 156 कोटींच्या रस्ते कामांवर घोटाळ्याचा आरोप


आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील नगरोत्थान योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या सुमारे १५६ कोटी रुपयांच्या रस्ते कामांमध्ये मोठा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नगरसेवकांनी केला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे करण्यात आली आहे. तुळजापूर शहरात नगरोत्थान योजनेतून विविध रस्त्यांची कामे करण्यात आली. मात्र या कामांमध्ये




मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप काँग्रेसच्या नगरसेवकांनी निवेदनाद्वारे केला आहे. संबंधित ठेकेदार के. एच. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी कामांसाठी खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी संपूर्ण कामांची तांत्रिक व आर्थिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे. शहरातील नागरिकांच्या पैशांचा अपव्यय झाला असल्याने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. या निवेदनावर गटनेते अमोल कुतवळ, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय कदम, प्रगती लोंढे आणि ऋषिकेश मगर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# प्राचार्या शुभांगी गावडे यांचे निधन



**कोल्हापूर :-** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे (वय 53) यांचे गुरुवारी (दि. 30 एप्रिल 2026) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यातील शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.त्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या नात, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या कन्या आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या मातोश्री होत.संस्थेत सहशिक्षिका, प्राचार्या व सचिवा म्हणून त्यांनी 2008 पासून कार्य करत शिक्षण क्षेत्रात अनेक नवे उपक्रम राबवले.त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी 1 मे रोजी सकाळी 9 ते 11 या वेळेत स्मृतिभवन, ताराबाई पार्क येथे ठेवण्यात येणार असून अंत्यसंस्कार दुपारी 12 वाजता पंचगंगा स्मशानभूमीत होणार आहेत

# मुक्या जीवांसाठी मनसेचा पुढाकार पानवठ्यांत पाण्याची सोय

**धाराशिव :-** जिल्ह्यात उन्हाचा कडाका वाढला आहे. माणसांसह मुक्या वन्य प्राण्यांचीही तहान भागवणे कठीण झाले आहे. जंगलात हरीण, ससे, मोर यांसारखे प्राणी पाण्यासाठी भटकताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला नवनिर्माण सेनेकडून पानवट्यांमध्ये पाण्याची सोय करण्यात



आली. वन विभागाने तयार केलेल्या पाणवठ्यांमध्ये मनसेच्या वतीने पाणी सोडण्यात आले. त्यामुळे वन्य प्राण्यांची पाण्यासाठीची भटकंती काही प्रमाणात थांबण्यास मदत होत आहे. मनसेचे जिल्हा सचिव दादा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शिक्षक सेनेचे नेते बबनराव वाघमारे, विद्यार्थी सेनेचे तन्मय वाघमारे आणि सामाजिक कार्यकर्ते अकबर काझी उपस्थित होते.

# मागण्या मान्य झाल्याने कृषी सेवा केंद्र चालकांचा संप मागे




आरंभ मराठी । धाराशिव

गेल्या तीन दिवसापासून राज्यात सुरू असलेला कृषी सेवा केंद्र चालकाचा संप मागे घेण्यात आला आहे. कृषी सेवा केंद्र चालकांच्या विविध प्रश्नावर सुरू असलेला संप मागे घेण्याबाबत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या सोबत माफदा संघटनेची बैठक पार पडली. मंत्रालय परिषद सभागृह येथे या बैठकीला कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह ऑनलाईन, कृषि आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक सुनिल बोरकर, माफदा संघटनेचे विनोद तराळ पाटील, ऑल इंडियाचे अध्यक्ष मनमोहन कलंतरे यासह संघटनेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत राज्यात उत्तरप्रदेशच्या धर्तीवर खते लीकिंग बंद करणेबाबत लवकरच ठोस निर्णय घेणार असल्याची माहिती कृषी मंत्री यांनी दिली. ज्या कंपन्यांना अनुदानित खते विक्रीचा अधिकार आहे, त्या कंपन्यांना विनाअनुदानित खते व इतर कृषी निविष्ठांची विक्री करता येणार नाहीत असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यात २७ एप्रिलपासून सुरू असलेल्या कृषि सेवा केंद्र चालकाचा संपाबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. शेतकऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेता हा संप मागे घेण्याची विनंती यावेळी त्यांनी संघटनेला केली. बियाण्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत पारदर्शकता यावी यासाठी 'साथी' पोर्टलचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन देखील विक्रेत्यांना करण्यात आले. विक्रेत्यांच्या अडचणी सोडवणे ही शासनाची जबाबदारी आहे. आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाचा कालावधी वाढविण्यात येणार असून ई-पॉस वापरकर्त्यांवर तात्पुरती कारवाई केली जाणार नाही, तसेच सीलबंद पॅकेजिंगबाबत विक्रेत्यांना दिलासा देण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेतला जाणार आहे. मुदतबाह्य किटकनाशकांबाबत कंपन्यांसोबत चर्चा करून योग्य तो मार्ग काढणार असल्याची माहिती कृषिमंत्र्यांनी यावेळी दिली. सोमवारपासून सुरू झालेला हा संप अखेर गुरुवारी (दि.३०) मागे घेण्यात आला.

# माणुसकीचे हृदयस्पर्शी दर्शन;धाराशिवकरांच्या मदतीने आज्जी सुखरूप घरी पोहोचल्या

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरात माणुसकीचा सुंदर आणि हृदयस्पर्शी नमुना पाहायला मिळाला. बारामती येथून दर्शनासाठी आलेल्या रेहाना महेबूब शेख या वृद्ध महिलांचा दरग्यात अपघात होऊन त्यांच्या पायाला फ्रॅक्चर झाले होते. त्यानंतर त्यांच्यावर शासकीय रुग्णालय, धाराशिव येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. उपचारानंतर त्यांना डॉ. विनोद गपाट यांच्या मातोश्री आश्रमात आश्रय देण्यात आला. मात्र, आपल्या गावाची ओढ लागल्याने आज्जींनी आश्रमात राहण्यास नकार दिला. प्रकृती नाजूक असतानाही त्यांच्या इच्छेचा मान राखत त्यांना घरी पोहोचवण्यासाठी अनेकांनी



पुढाकार घेतला. या संपूर्ण प्रक्रियेत आशाताई कांबळे यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज्जींना सुरक्षितपणे त्यांच्या घरी पाठवणे शक्य झाले. वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक नवनाथ सरवदे यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र आज्जी आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. यानंतर सामाजिक कार्यकर्ते उमर खान, सद्दाम शेख तसेच ऑल इंडिया पयाम-ए-इंसानियत फोरमच्या सदस्यांनी पुढाकार घेत रेल्वेमार्गे त्यांना सुरक्षितपणे पाठवण्याची जबाबदारी स्वीकारली. दौंडपासून पुढील प्रवासासाठीही कार्यकर्त्यांनी योग्य नियोजन केले. रविवारी (दि.२६) आशाताई कांबळे व सद्दाम शेख यांनी स्वतः धाराशिव रेल्वे स्थानकावरून आज्जींना निरोप दिला. प्रवासात कोणतीही अडचण येऊ नये म्हणून त्यांना आर्थिक मदतही करण्यात आली. भावनिक वातावरणात आज्जींनी सर्वांना आशीर्वाद दिला. नंतर त्या सुखरूप बारामती येथे पोहोचल्याची माहिती मिळाली असून, या घटनेमुळे धाराशिवकरांच्या माणुसकीचे पुन्हा एकदा दर्शन घडले. या कार्यात वैद्यकीय समाज सेवा अधीक्षक नवनाथ सरवदे, महेश पाटील, गणेश वाघमारे, डॉ. विनोद गपाट, अनुजाताई पानसरे, मातोश्री आश्रमातील सदस्य तसेच पयाम-ए-इंसानियत फोरमचे कार्यकर्ते यांनी मोलाचे योगदान दिले.

## मालकी हक्काच्या जागेतील दुकानावर अतिक्रमण कारवाई केल्यामुळे तुळजापूर नगरपरिषदेविरोधात तक्रार

आरंभ मराठी / तुळजापूर

तुळजापूर शहरात नगरपरिषदेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात ये[…] असताना, मालकी हक्काच्या जागेतील […] अतिक्रमण म्हणून पाडण्यात आल्याचा […] आरोप समोर आला आहे. याप्रकरणी सं[…] नागरिकाने तुळजापूर पोलीस ठाण्यात त[…]



## 2020 च्या पीक विमा प्रकरणात पुढील सुनावणी 6 मे रोजी

आरंभ मराठी / धाराशिव

खरीप 2020 हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत दाखल करण्यात आलेल्या पीक विमा प्रकरणात पुन्हा एकदा 'तारीख पे तारीख'ची स्थिती निर्माण झाली आहे. 24 एप्रिल 2026 रोजी झालेल्या सुनावणीतही कोणताही ठोस निर्णय न होता न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख 6 मे 2026 अशी

## प्रतिबंधित गुटखा साठा व दोन पिकअपसह 13.70 लाखांचा मुद्देमाल जप्वा; शी पोलिसांची कारवाई

आरंभ मराठी / वाशी

वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी ( दि.23 ) दुपारी सु. रुई शिवारातील कॅनल परिसरात मोठी कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत महिंद्रा बोलेरो पिकअप ( क्र. एमएच 23 ए.यु. 1191 ) व अशोक लिलॅण्ड पिकअप ( क्र. एमएच 23 ए.यु. 3439 ) या दोन वाहनांमधून "प्रिमियम शॉट लक्झरी टोबॅको" या नावाचे लाल व हिरव्या रंगाचे एकूण 7,404 गुटखा पाउच आढळून आले. या गुटखा साठ्याची किंमत 4,70,880 रुपये असून, दोन्ही वाहनांसह एकूण मुद्देमालाची किंमत 13,70,880 रुपये इतकी आहे. सदर माल विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक व साठवणूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ गुटखा व वाहने जप्त करून संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.